Save Water Essay In Marathi 250 Words

**शरीर आणि पंच महाभूत**

आपले शरीर हे पंच महाभूतांपासून बनलेले आहे. हवे नंतर सर्वात महत्वाची गोष्टी जी शरीराला नेहमी लागते ती म्हणजे पाणी. पाण्यावर फक्त मनुष्य अवलंबून नाही तर प्राणी, झाडे, शेती अशा बऱ्याच गोष्टी आहेत.

**पाण्याचे महत्व**

आपली पृथ्वी हि ७५ टक्के पाण्याने भरली आहे. पण आपण ते पाणी पिऊ शकत नाही. जगात फक्त २ ते ३ टक्के पाणी पिण्यायोग्य आहे. म्हणून पाण्याचा जपून वापर करणे अतिशय महत्वाचे आहे.

**पृथ्वीवरील पाण्याचे वितरण**

दिवसभरात आपण पाण्याचा भरपूर वापर करतो. अंघोळ, धुणे, पिणे आणि स्वयंपाकामध्ये पाण्याचा वापर करतो. पाण्याशिवाय आपले जगणे खूप कठीण होऊन जाईल. कारण आपण जे अन्न खातो ते सुद्धा शेतीतून येते आणि त्यासाठी पाणी लागते.

**दुष्काळ आणि पाणी व्यवस्थापन**

भारतीय शेती ही पूर्णपणे पाण्यावर अवलंबून आहे. देशातील काही भागात १२ महिने दुष्काळ असतो. जरी पाऊसाचे पाणी आले तरी ते साठवता आले पाहिजे.महाराष्ट्रात खूप आधी जागोजागी तळे बांधण्यात आले आहेत. त्याच तळ्यांमुळे दुष्काळी भागात शेती केली जाते. समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन ढग बनतात आणि नंतर पाऊस होतो. तेच पावसाचे पाणी पिण्यायोग्य असते.

**धरणे आणि तळ्यांचे महत्व**

धरण किंवा तळे बांधल्याने ज्यांना पाणी नाही त्यांना पाणी उपलब्ध करू शकतो. लाखो टन पाणी वाया जात आहे रोज. हे पाणी मुबलक आहे, परंतु वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे कधी खूप कमी पाऊस किंवा कधी जास्त पाऊस पडतो. आपण सर्वजण पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहोत.

**पाणी वाचवण्याचे उपाय**

आपण आज पाणी वाचवण्याचे शिकलो तर उद्या आपल्या पुढल्या पिढीला पाणी जपून वापरण्याची सवय लागेल. यावर्षी बऱ्याच ठिकाणी मे महिन्यात शहरी भागात सुद्धा पाणी कमी होते. कारण पाणी वाया घालवणे आणि रोज नवीन नवीन पिण्याच्या पाण्याच्या कंपन्या उभ्या राहणे. याच कंपन्यांमुळे पाण्याची कमतरता सामान्य माणसाला भोगावी लागते.